

विधान सभा

महाराष्ट्र


# निलेश ज्ञानदेव लंके

सदस्य, विधानसभा महाराष्ट्र
२२४ पारनेर–नगर मतदार संघ

संपर्क कार्यालय : न्यु आर्टस कॉलेज शेजारी, पारनेर ता.पारनेर जि.अहमदनगर पिन : ४१४३०२ फोन- (०२४८८) २९५३३३
एल.आय.सी.ऑफीस समोर, ईगलप्राईड, बुरुडगांव रोड, अहमदनगर पिन : ४१४००१ मो.९८२२५१९२५८
Email Id : mlanileshlanke3333@gmail.com


**आ.का.पारनेर/४२२३** **दिनांक : ३०/०७/२०२३**

प्रति,
**मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई – 32

**विषय:- माझ्या मतदार संघातील पारनेर नगरपंचायत हद्दीतील कामांना ठोकतरतूद मधून निधी मिळणे बाबत.**

आदरणीय दादा,

उपरोक्त विषयानुसार माझ्या मतदार संघातील पारनेर नगरपंचायत हद्दीतील खालील विविध विकास कामाची मागणी नागरिकांनी वारंवार केली असल्याने सदर कामांना मंजुरी देऊन ठोकतरतूद अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात यावा ही नम्र विनंती.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रूपये |
|---|---|---|
| 1 | पारनेर नगरपंचायत मधील प्रभाग क्रमांक-९ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन बांधणे. | ७०.०० लक्ष |
| 2 | पारनेर नगरपंचायत मधील प्रभाग क्रमांक-२ मध्ये राममंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे. | ५०.०० लक्ष |
| 3 | पारनेर नगरपंचायत मधील प्रभाग क्रमांक-१५ मध्ये महानगर बँक ते कृषी उत्पन्न बाजार समिती रस्ता करणे. | ७५.०० लक्ष |
| 4 | पारनेर नगरपंचायत मधील प्रभाग क्रमांक-१७ मध्ये वरखडा देवी मंदिरासमोर सभामंडप बांधणे. | २५.०० लक्ष |
| 5 | पारनेर नगरपंचायत मधील प्रभाग क्रमांक-१० मध्ये कॉलेज रोड ते सुपा रस्ता सुधारणा करणे. | २०.०० लक्ष |
| 6 | पारनेर नगरपंचायत मधील प्रभाग क्रमांक-१६ मध्ये सुपा रोड ते लांडे वस्ती रस्ता करणे. | ५०.०० लक्ष. |

सस्नेह धन्यवाद!

आपला नम्र,

( निलेश ज्ञानदेव लंके)

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
(नगरपरिषद प्रशासन शाखा)

दूरध्वनी क्र.: (०२४१) २३४ ५६८०    E-mail ID: daoahmednagar@gmail.com

## प्रशासकीय मान्यता आदेश

**विषय:- वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान- योजने अंतर्गत पारनेर नगरपंचायत हद्दीतील विविध विकास कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**वाचले:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.धोरण २०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि.१७/११/२०१७
२. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-धोरण- २०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि.३०/०९/२०२०
३. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- नपावै-२०२३/प्र.क्र.५८४(३३)/ नवि-१६ दि.२४/०८/२०२३ व शुद्धिपत्रक दि.२५/०९/२०२३
४. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./प्र.शा.-१/१०२३०/सन २०२३ दि.१५/१२/२०२३ व त्रुटीपूर्तता – जा.क्र.प्रशा-१/४५५/सन२०२४ दि.१५/०१/२०२४
५. मुख्याधिकारी, पारनेर नगरपंचायत यांचेकडील ना- हरकत प्रमाणपत्र व अन्य प्रमाणपत्रे
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडील तांत्रिक मंजूरी आदेश
७. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडील PCI प्रमाणपत्र Ref COEP/consultancy/ Road /PMC/Parner/CED/3335 Dated 07/11/2023
८. पारनेर न.पं.मधील प्रभाग क्र.२ मध्ये राम मंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे या कामाकरिता सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर, यांचेकडील बांधकाम परवानगी जा.क्र./बां.प./मौजे पारनेर नगरपंचायत मिळकत नंबर२/प्रभाग क्र.२/ससंअ/४३४५ दि.०८/१२/२०२३

---

ज्याअर्थी, वाचले क्र. ३ चे शासन निर्णय अन्वये शासनाच्या नगरपालिकाना वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान - लेखाशीर्ष (४२१७०६०३) योजनेअंतर्गत सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षांत पारनेर नगरपंचायत हद्दीतील हद्दीतील एकूण ०६ कामांना रक्कम रु.०२,९०,००,०००/- (अक्षरी दोन कोटी नव्वद लक्ष रुपये) इतके अनुदान मंजूर झालेले होते. सदरील कामाची कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. सदरील निधी खर्च करणेची मुदत ३१ मार्च २०२५ आहे. सदरील कामास १००% शासन निधी मंजूर आहे.

ज्याअर्थी, वाचले क्र. ४ नुसार प्रशासकीय मान्यता मिळणेकामी प्रस्तावाचा पुढीलप्रमाणे आहे.

<u>प्रस्तावाचा तपशील:-</u>

| अ. क्र. | कामाचे नाव | शासन निर्णय दि.२४/०८/२०२३ नुसार मंजूर रक्कम रु.(लक्ष) | तांत्रिक Aproval तपशील व रक्कम रुपये | centage charge रक्कम | centage charge वगळून द्यायची प्रशासकीय मान्यता रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पारनेर न.पं.मधील प्रभाग क्र.१५ मध्ये महानगर बँक ते कृषी उत्पन्न बाजार समिती रस्ता करणे | 75 | पान नं. 224 75 लक्ष | 293080 | 7206920 |
| २ | पारनेर न.पं.मधील प्रभाग क्र.१६ मध्ये सुपा रोड ते लांडे वस्ती रस्ता करणे. | 50 | पान नं.25 50 लक्ष | 192158 | 4807842 |
| ३ | पारनेर न.पं.मधील प्रभाग क्र.१० मध्ये कॉलेज रोड ते सुपा रस्ता सुधारणा करणे | 20 | पान नं.187 20 लक्ष | 78140 | 1921860 |
| ४ | पारनेर न.पं.मधील प्रभाग क्र.२ मध्ये राम मंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे. | 50 | पान नं.105 50 लक्ष | 197387 | 4802613 |
| | **एकूण** | **195** | **195** | **760765** | **18739235** |

ज्याअर्थी, उपरोक्त प्रस्तावित कामांस वाचले क्र.५ नुसार सर्वसाधारण सभा, पारनेर नगरपंचायत यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे. आणि ज्याअर्थी, वाचले क्र.६ नुसार प्रस्तावित कामांना Technical Aproval दिलेले आहे. आणि ज्याअर्थी वाचले क्र.७ नुसार रस्त्यांचे कामांना PCI प्रमाणपत्र दिले आहे. तसेच ज्याअर्थी इमारत बांधकामाचे कामास वाचले क्र.८ नुसार बांधकाम परवानगी प्राप्त आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी अहमदनगर, मला वाचले क्र. १ ते ३ अन्वये प्राप्त अधिकारांनुसार उपरोक्त प्रस्तावाचा तपशील मध्ये नमूद कामांना centage charge वगळून **रक्कम रु.१,८७,३९,२३५/- (अक्षरी- एक कोटी सत्याऐंशी लक्ष एकोण चाळीस हजार दोनशे पस्तीस रुपये)** इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तींवर प्रदान करीत आहे.

**अटी व शर्ती:-**

१. विहित मुदतीत निधी खर्च करावा, मुदत संपलेनंतर अखर्चित निधी व्याजासह शासन खाती तात्काळ जमा करावा. निधी खर्च झालेनंतर विनियोग प्रमाणपत्र, उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास व शासनास सादर करावे. तसेच यापूर्वी या योजनाखाली/ लेखाशीर्षाखाली वितरीत केलेल्या निधीचे विनियोग, उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करावीत.

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदींचे पालन करावे.

३. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता२०१३मधील तरतुदींचे पालन करावे.

४. सदर प्रकल्पांतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरूप सार्वजनिक असावे,तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करावी.

५. कुठल्याही खाजगी स्वरूपाच्या कामांना मान्यता देणेत आली नसल्याची खातरजमा करावी.

६. हाती घ्यावयाची कामे सर्वसाधारणपणे नागरिकांच्या ठळकपणे लक्षात येतील किंवा नागरिकांना त्या कामांचा बोध होईल अशा स्वरूपाच्या कामांनाच प्राधान्य देणेत यावे.

७. सदर प्रकल्पांतर्गतची कामे संबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखड्याशी सुसंगत असल्याची खातरजमा करावी.

८. सदर प्रकल्पांतर्गतच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणेत यावे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक राहील.

९. प्रस्तावित कामांच्या ई-निविदा अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरूपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करून दिले जाणार नाही.

१०. शासनाकडून मंजूर निधीपेक्षा अधिकचा खर्च नगरपरिषद निधीमधून करावा.

११. ई-निविदा अंती प्रकल्प खर्च खर्च तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास सदर कमी झालेल्या खर्चाची राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी.

१२. सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टांसाठी खर्च करणेत येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजुर कामावरच मंजुर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहावे.

१३. प्रस्तावित कामांमुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहावे.

१४. निधी खर्च करताना तो विहित कार्यपद्धती अनुसरून सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहित प्रक्रियेचे अवलंबन करणेत यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करणेत आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहावे.

१५. सदर प्रकल्पाअंतर्गत दुरुस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहावे.

१६. सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरु करण्यापूर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photographs)काढून ठेवावे व मागणीनुसार सादर करावे.

१७. शासन निर्णय दि.२८/०३/२०१८ अन्वये त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१८. पायाभूत सुविधाअंतर्गतच्या कोणत्याही कामांची द्विरुक्ती होणार नाही, याबाबतची दक्षता घेणेत यावी.प्रस्तावित कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातुन होत नाहीत, प्रस्तावित रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेतून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाहीत याची कामे सुरु करण्यापूर्वी पुनश्च: खात्री करावी.

१९. सध्या सुरु असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशा प्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठिकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची दक्षता घ्यावी.

२०. कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणाऱ्या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

२१. रु.१० लक्ष पेक्षा कमी तांत्रिक मान्यता रकमेची कामे एकत्रित (package) करून सदरील प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करावी.

२२. प्रशासकीय मान्यतेच्या रकमेचे पुनश्च: विलगीकरण करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल.

२३. प्रस्तावित कामे करताना उच्च गुणवत्ता असलेल्या/आयएसआय प्रमाणित मटेरियल्सची खरेदी करावी.

२४. सदर प्रशासकीय मान्यता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर कार्यालयाने पुरविलेल्या माहितीच्या आधारे देणेत येत आहे. माहिती चुकीची आढळून आल्यास त्याची सर्वस्वी त्यांची राहील.

२५. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.धोरण २०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि.१७/११/२०१७, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक-धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि.३०/०९/२०२० महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- नपावै-२०२३/प्र.क्र.५८४(३३)/ नवि-१६ दि.२४/०८/२०२३ व शुद्धिपत्रक दि.२५/०९/२०२३मध्ये नमूद अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील.

२६. प्रभाग क्र.२ मध्ये राम मंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे या कामाकरिताची जागा पारनेर नगरपंचायतीचे नावावर करून घ्यावी. तदनंतर सदरील कामाची निविदा प्रक्रिया करावी.

Signed by
Sidharam Karbasayya Salimath
Date: 05-02-2024 12:52:15

**सिद्धाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर**

**प्रति-** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडेस कार्यवाहीसाठी ई-मेलद्वारे